## निशाणी क्रमांक २८ वरील आदेश

**१.** वादीने प्रस्तुतचा दावा हा मौजे शिराढोण, ता. कळंब येथील शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/ब क्षेत्र ६ एकर १९ आर या मिळकतीची मालकी घोषीत होवून मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी हजर होवुन निशाणी क्र. २२ कडे त्यांची लेखी कैफियत दिली आहे. सदर प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये वादीविरूध्द प्रतिदाव्याची उभारणी केली आहे. सदर प्रतिदाव्यामध्ये त्यांनी मौजे शिराढोण, ता. कळंब येथील शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ एकुण क्षेत्र ९ एकर १९ आर पैकी क्षेत्र ३ एकर ६ आर व तसेच, सर्व्हे क्र. ३०० एकुण क्षेत्र ११ एकर ३१ आर पैकी क्षेत्र ३ एकर ३७ आर या मिळकतींबाबत वादीच्या विरूध्द निरंतर मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी त्यांच्या निशाणी क्र. २२ कडील कैफियतीमध्ये उभारलेल्या प्रतिदाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र. २८) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ३९ नियम १ (अ) व (क) प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला असुन त्याद्वारे त्यांनी अशी मागणी केली आहे की, मौजे शिराढोण, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ एकुण क्षेत्र ०९ एकर १९ आर पैकी क्षेत्र ३ एकर ६ आर व तसेच सर्व्हे क्र. ३०० एकुण क्षेत्र ११ एकर ३१ आर पैकी क्षेत्र ३ एकर ३७ आर विशेषतः प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये वर्णन केलेल्या त्यांच्या मालकीच्या व कब्जे-वहिवाटीच्या मिळकतींस वादीने दाव्याचा व प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत हरकत- अडथळ करू नये. (यापुढे सदर मिळकतींना 'वादग्रस्त मिळकती' असे संक्षिप्तपणे संबोधले आहे).

**<u>प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे</u>** :-

**३.** प्रतिवादी क्र. १ अभिमान व प्रतिवादी क्र. २ बब्रुवान हे सख्खे भाऊ आहेत. प्रतिवादी क्र. ५ सुरेश व प्रतिवादी क्र. ६ रमेश ही प्रतिवादी क्र. १ व २ यांचे मयत भाऊ

किसन यांची मुले आहेत. वादग्रस्त मिळकती हया प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील आणि प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे आजोबा भगवान राठोड यांनी दिनांक ०२.०५.१९७५ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी घेतल्या होत्या. सदर खरेदीखताच्या आधारे फेरफार क्र. १४१२ मंजुर झालेला आहे. वादग्रस्त मिळकतींशी वादीचा काहीही हक्क-हितसंबंध नाही. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादग्रस्त मिळकती त्यांच्या कब्जे-वहिवाटीस आहेत. तरीही, दिनांक १३.०९.२०१६ रोजी वादीने त्यांच्या वादग्रस्त मिळकतींवरील कब्जे-वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केला. म्हणुन, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांना प्रतिदावा दाखल करणे भाग पडले आहे. दाव्याचा व प्रतिदाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने सदर प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**४.** प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या कथनानुसार, त्यांना प्रथमदर्शनी बाजु आहे व न्यायाचा समतोल देखील त्यांच्याच बाजुने आहे. प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होईल असे त्यांनी कथन केले आहे. अशाप्रकारे, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**५.** प्रस्तुत अर्जास वादीने त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र. ४६ कडे दाखल केले आहे. त्यांच्या कथनानुसार, शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर नसुन ते ६ एकर १९ आर आहे. वादीच्या मते, शेतजमीन सर्व्हे क्र. २९२/अ क्षेत्र ६ एकर १९ आर व तसेच मौजे शिराढोण येथील शेतजमीनी, नामे- सर्व्हे क्र. २९३/ब, २९८/ड, २९९/ड व ३००/ड या मिळकतींची मुळ मालक गिताबाई ओमने ही होती. तिने तिच्या वर नमुद मिळकती दिनांक ३०.०९.१९५८ रोजी तुकाराम देशमुख, शिवराम देशमुख व गेना देशमुख यांना नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केल्या. सदर खरेदीखताच्या आधारे सन १९६५ मध्ये फेरफार क्र. ६४ मंजुर झाला. वादीच्या कथनानुसार, सर्व्हे क्र. २९२/अ क्षेत्र ६ एकर १९ आर या मिळकतीपैकी १/३ हिश्याचे

म्हणजेच क्षेत्र २ एकर ६ आर या मिळकतीचे गेना देशमुख हे मालक होते. त्यामुळे, गेना यांना भगवान राठोड (प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील, व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे आजोबा) यांच्या हक्कात सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर या मिळकतीचे खरेदीखत करून देण्याचा अधिकार नव्हता. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादग्रस्त मिळकतींपैकी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर ही मिळकत प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या कब्जे-वहिवाटीस नाही. तसेच, वादग्रस्त मिळकतींच्या चतु:सिमा संदिग्ध आहेत.

**६.** वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या बाजुने प्रथमदर्शनी स्थिती नाही व तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजुने नाही. प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास सदर प्रतिवादींपेक्षा त्यांनाच जास्त नुकसान होईल असे वादीचे म्हणणे आहे. शेवटी, वादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**७.** दोन्ही पक्षांच्या परस्पर कथनांच्या आधारे खालील मुद्‍दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष खालील कारणांसह दिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्‍दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ हे सिध्द करतात काय की, त्यांच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे ? | : | नकारार्थी |
| २ | प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे ? | : | नकारार्थी |
| ३ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर झाल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होईल ? | : | वादीचे |
| ४ | आदेश काय? | | .अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

**<u>का र णे मि मां सा</u>**

**८.** मी प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री.आर.जी.अंधारे व वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.पवार यांचा युक्तीवाद श्रवण केला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :**

**९.** प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी प्रस्तुतच्या अर्जाच्या पुष्टयर्थ निशाणी क्रमांक २९ कडे प्रतिवादी क्र. १ अभिमान राठोड यांचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर प्रतिवादींच्या कथनानुसार, वादग्रस्त मिळकती हया भगवान राठोड (प्रतिवादीक्र. १ व २ यांचे वडील, व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे आजोबा) यांनी दिनांक ०२.०५.१९७५ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी घेतल्या होत्या व तसेच सदर खरेदीखताच्या आधारे फेरफार क्र. १४१२ मंजुर झालेला आहे. सदर प्रतिवादींच्या मते वादग्रस्त मिळकतींशी वादीचा काहीही हक्क-हितसंबंध नाही. तरीही, दिनांक १३.०९.२०१६ रोजी वादीने वादग्रस्त मिळकतींवरील त्यांच्या कब्जे-वहिवाटीस हरकत अडथळा केला. म्हणुन, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या मते त्यांना प्रथम दर्शनी प्रकरण आहे.

**१०.** याउलट, वादीने असे कथन केले आहे की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर नसुन ते ६ एकर १९ आर आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सर्व्हे क्र. २९२/अ क्षेत्र ६ एकर १९ आर ही मिळकत गिताबाई ओमने हिच्या मालकीची होती. दिनांक ३०.०९.१९५८ रोजी सदर गिताबाई हिने सर्व्हे क्र. २९२/अ ही मिळकत व तिच्या मौजे शिराढोण येथील इतर काही शेतजमीनी तुकाराम देखमुख, शिवराम देशमुख व गेना देशमुख यांना खरेदीखताने विक्री केल्या. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीमध्ये १/३ हिश्याप्रमाणे गेना देखमुख हे २ एकर ६ आर क्षेत्राचे मालक होते. त्यामुळे त्यांना भगवान राठोड यांच्या हक्कात सर्व्हे

क्र. २९/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर या मिळकतीचे खरेदीखत करून देण्याचा अधिकार नव्हता. वादीच्या मते, वादग्रस्त मिळकतीपैकी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर ही मिळकत प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या कब्जे-वहिवाटीस नसल्यामुळे सदर प्रतिवादींच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण नाही.

**११.** प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी अभिलेखावरती दिनांक ०२.०५.१९७५ रोजीच्या खरेदीखताची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच, त्यांनी सदर खरेदीखतावरून मंजुर झालेल्या फेरफार क्रमांक १४१२ ची साक्षांकित प्रत निशाणी क्र. ४० कडे दाखल केलेली आहे. याउलट, वादीने अभिलेखावर दिनांक ३०.०९.१९५८ रोजीच्या खरेदीखताची साक्षांकित प्रत निशाणी क्र. ५७ कडे दाखल केली आहे. सदर खरेदीखताच्या आधारे मंजुर झालेल्या फेरफार क्र. ६४ ची साक्षांकित प्रत वादीने निशाणी क्र. ५८ कडे दाखल केली आहे. याशिवाय, वादीने सर्व्हे क्र.२९२/अ या मिळकतीच्या खासरा-पाहणी पत्रकाची साक्षांकित प्रत निशाणी क्र. ५४ कडे दाखल केली आहे. मी, वर नमुद कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

**१२**. निशाणी क्र. ५७ कडील दिनांक ३०.०९.१९५८ रोजीच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ६ एकर १९ आर आहे. सदर खरेदीखतानंतर सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर कसे झाले ?, याबाबत प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या कथनानुसार, भगवान राठोड यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर खरेदी केले होते. भगवान राठोड यांच्या हक्कातील दिनांक ०२.०५.१९७५ रोजीच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यांनी वादग्रस्त मिळकती म्हणजेच सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ३ एकर ६ आर व सर्व्हे क्रमांक ३०० मधील क्षेत्र ३ एकर ३७ आर खरेदी केले होते. निशाणी क्र. ५८ कडील फेरफार क्र. ६४ चे अवलोकन केले असता असे दिसुन

येते की, सदर फेरफार सन १९६५ मध्ये मंजुर झालेला आहे. सदर फेरफाराचे अवलोकन केले असता पुढे असे दिसुन येते की, सदर फेरफार मंजुर करते वेळी गेना देशमुख मयत होते. याउलट, दिनांक ०२.०५.१९७५ रोजीच्या भगवान राठोड यांच्या हक्कात खरेदीखतास गेना देशमुख यांचे नाव लिहुन देणार म्हणुन लिहील्याचे दिसुन येते. जर, गेना देशमुख हे फेरफार क्र. ६४ मंजुर करते वेळी (सन १९६५ मध्ये) मयत होते, तर ते दिनांक ०२.०५.१९७५ रोजीच्या खरेदीखताच्या वेळी जिवंत कसे झाले ?, याचा उलगडा होत नाही.

**१३**. अभिलेखाचे अवलोकन केले असता पुढे असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ३ माणीक व प्रतिवादी क्र. ४ रामराव यांनी देखील निशाणी क्र. २२ कडील कैफियतीमध्ये प्रतिदावे उभारलेले आहेत. प्रतिवादी क्र. ३ यांच्या प्रतिदाव्यातील कथनानुसार, त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ४ एकर ७ आर ही मिळकत गुणवंत पवार यांच्याकडुन खरेदी घेतली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४ यांच्या प्रतिदाव्यातील कथनानुसार, त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र २ एकर २ आर ही मिळकत मदन देशमुख यांच्याकडुन दिनांक ०२.०१.१९९६ रोजी खरेदी घेतली आहे. तसेच, त्यांनी दिनांक २७.०१.२००९ रोजी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र २ एकर ही मिळकत सदाशिव देशमुख यांच्याकडुन खरेदी घेतली आहे. एकंदरीत, सर्व प्रतिवादींची कथने एकत्रीतपणे विचारात घेतली तर त्यांनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील क्षेत्र ११ एकर १५ आर खरेदी केल्याचे दिसुन येते. प्रतिवादींच्याच कथनानुसार, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे एकुण क्षेत्र ९ एकर १९ आर आहे.

**१४**. यापुर्वीच, मी नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.१, २, ५ व ६ यांनी सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ६ एकर १९ आर वरून ९ एकर १९ आर कसे झाले?, याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच, सर्व प्रतिवादींनी सर्व्हे क्र. २९२/अ मधील खरेदी केलेल्या क्षेत्रांची बेरीज ही ९ एकर १९ आर पेक्षाही जास्त येते. परिणामी, भगवान राठोड (प्रतिवादी क्र. १, २ यांचे वडील, व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे आजोबा) यांच्या हक्कातील वादग्रस्त मिळकतींपैकी सर्व्हे क्र. २९२/अ

मधील क्षेत्र ३ एकर ६ आर च्या संदर्भातील खरेदीखत हे सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकती मधील गेना देशमुख यांना येत असलेल्या क्षेत्राशी विसंगत असल्याचे दिसुन येते. कारण, गेना देशमुख हे सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीमधील क्षेत्र २ एकर ६ आर क्षेत्राचे मालक होते. पुढे, मला असे नमुद करावेसे वाटते की, दिनांक ३०.०९.१९५८ रोजीच्या खरेदीखतामध्ये सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ६ एकर १९ आर दर्शविले आहे, तर सदर मिळकतीचे क्षेत्र दिनांक ०२.०५.१९७५ रोजीच्या भगवान राठोड यांच्या हक्कातील खरेदीखतामध्ये ९ एकर १९ आर दर्शविले आहे. तसेच, निशाणी क्र. ५४ कडील सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीच्या खासरा-पाहणी पत्रकाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीचे क्षेत्र ९ एकर १९ आर नसुन ६ एकर १९ आर आहे.

**१५**. मला याठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, जरी दिनांक ०२.०५.१९७५ रोजीचे खरेदीखत हे अद्यापपावेतो कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्दबातल ठरवले नसले तरीही सदर खरेदीखत हे सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीच्या मुळ क्षेत्राशी तसेच गेना देशमुख यांना येत असलेल्या क्षेत्राशी विसंगत आहे. याशिवाय, सर्व्हे क्र. २९२/अ या मिळकतीच्या मुळ क्षेत्रात वाढ कशी झाली ?, याबाबत प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांनी खुलासा केलेला नाही. अशा परिस्थितीत, माझ्या मते, प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्याबाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे असे कदापि म्हणता येणार नाही. तसेच, सदर प्रतिवादी हे स्वच्छ हाताने न्यायालयात आल्याचे दिसुन येत नाही. परिणामी, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ व ३ बाबत** :-

**१६.** मुद्दा क्र. २ व ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांना एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहे. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण नसल्यामुळे न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजुने नसल्याबाबत गृहीत धरणे योग्य आहे.

म्हणुन, न्यायाचा समतोल हा प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या बाजुने असल्याची बाब सदर प्रतिवादींनी सिध्द केली नाही हे स्पष्ट होते. म्हणुन, मी मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादीचेच अपरिमीत असे नुकसान होणार आहे. कारण, प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्याकडुन वादीच्या कब्जे-वहिवाटीच्या दावा मिळकतीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष मी त्या अनुषंगाने नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबत** :-

**१७.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्ष प्राप्तीनुसार प्रस्तुतचा अर्ज हा नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१**. निशाणी क्र. २८ कडील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**२**. प्रस्तुत अर्जाच्या खर्चाचा विचार अंतिम खर्चाच्या तपशिलावेळी करण्यात यावा.

कळंब.
दिनांक : ०२-०२-२०१७.

स्वाक्षरीत/-
( एस.एस.उबाळे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळंब.